N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** बंडगार्डन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0151  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/06/2024 06:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 31/05/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/05/2024
**Time From (वेळेपासून):** 17:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/06/2024  **Time (वेळ):** 06:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/06/2024 06:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** परमार चेंबर येथील,स्टेटस फमिली रेस्टॉरट ,अँड बार मध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अश्री. राजकुमार कौडुमल थडाणी
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1964
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सर्वे नं191,नागपुर चाळ, येरवडा, पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सर्वे नं191,नागपुर चाळ, येरवडा, पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री अभिजीत व्यंकटराव जिचकार | | | 1. फ्लट नं बी- 3, 404,, हीदम सोसायटी, काळेवाडी फाटा, वाकड, पुणे ,बंडगार्डन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

बंडगार्डन पो.स्टे गुन्हा रजि.नं. व कलम 151/2024 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7, 7-अ अन्वये
दाखल करणार -श्री. विरनाथ माने, पोलीस निरीक्षक, लाप्रवि पुणे
फिर्यादी नाव पत्ता -अश्री. राजकुमार कौडुमल थडाणी वय 60 वर्षे, धंदा सेवानिवृत, रा.सर्वे नं.191, नागपुर चाळ, येरवडा, पुणे मो.9665270551
आरोपी नाव पत्ता -लोकसेवक श्री. अभिजीत व्यंकटराव जिचकार वय 34 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद - प्रोजेक्ट मॅनेजर, नेमणुक - म्हाडा कार्यालय, पुणे रा. फ्लॅट नं. बी- 3, 404, -हीदम सोसायटी, काळेवाडी फाटा, वाकड, पुणे.
मुळगाव - प्लॉट नं.117, दत्तात्रय नगर, एनआटी गार्डनच्या मागे, नागपूर
गु.घ. दिनांक, वेळ वठिकाण - दि.31/05/2024 रोजी 17.20 वा सुमारास परमार चेंबर येथील स्टेटस फॅमिली रेस्टॉरंट अँड बार मध्ये
थोडक्यात हकीकत -माझे नांव- श्री. राजकुमार कौडुमल थडाणी वय 60 वर्षे, धंदा सेवानिवृत, रा.सर्वे नं.191, नागपुर चाळ, येरवडा, पुणे मो.9665270551

समक्ष हजर राहुन जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटंूबासह राहण्यास आहे. दि. 30/10/2023 रोजी मी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) पुणे यांच्याकडे ऑनलाईन पध्दतीने सदनिका मिळविण्यासाठी अर्ज केला होता. त्यावर मला म्हाडातर्फे लॉटरी पध्दतीने घर मिळाले होते. त्याचे स्विकृती पत्र दि.13/12/2023 भरुन म्हाडा, पुणे यांना दिले होते. वरील सदनिकेच्या संदर्भाने म्हाडा तर्फे मला तात्पुरते देकारपत्र देण्यात आले होते. त्यामध्ये प्लॉट डी - 1, संत तुकाराम नगर, पिंपरी येथील डी/704 हा 3 बीएचके सदनिका रुपये 90,79,900/- ला वितरित केल्याचे नमुद केले होते. परंतु म्हाडा, पुणे तर्फे देण्यात आलेल्या वर्तमान पत्रातील सुरुवातीच्या जाहिरातीमध्ये रु 7,37,281/- रुपये हि रक्कम अधीकची लागेल याबाबत कुठेही नमुद करण्यात आलेले नव्हते.

त्याचवेळी म्हाडा, पुणे तर्फे मला सदनिकेच्या हप्त्याची रक्कम भरण्याबाबत वेळापत्रक दिले होते. वरील सदनिकेची वाढीव रक्केमेची जुळवा जुळव करणे मला अशक्य झाल्याने माझ्याकडून बॅकेची के.वाय.सी. व अन्य कागदपपत्रे वेळेत उपलब्ध झाले नाही. त्यामुळे मी दि. 22/02/2024 सदनिकेच्या हप्त्याची रक्कम भरण्याची मुदतवाढ मिळण्यासाठी म्हाडा, पुणे कार्यालयात लेखी अर्ज दिला होता. दि.01/03/2024 रोजी मी बॅक ऑफ महाराष्ट्र च-होली शाखा, पुणे येथून म्हाडा ने दिलेल्या आर.टी.जी.एस. चलनावरुन रुपये 8,67,995/- इतकी रक्कम सदनिकेचा रकमेचा हप्ता जमा केला होतो. परंतु सदरची रक्कम म्हाडा, पुणे यांच्या वतीने न स्विकारल्यामुळे परत आली होती. त्यांनतर दि.15/04/2024 रोजी माझी सदनिका रद्द केल्याचा फोन वर मॅसेज आला होता. त्यामुळे मी पुन्हा नव्याने त्याच दिवशी व्याज, दंड व विलंब शुल्कासह सदनिका रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतचा अर्ज म्हाडा पुणे यांना दिला होता. त्यांनतर दि.18/04/2024 रोजी मी वरील प्रकारणांची सविस्तर माहिती नमुद करुन सदनिका घेण्यास इच्छुक असल्याचे पत्र दिले होते. त्यावेळी म्हाडा, पुणे कार्यलयातील कर्मचारी श्री. अभिजीत जिचकार यांची भेट घेऊन बॅकेचे चलन पावती देण्याची विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी मला सदनिका पुन्हा वितरित करण्यासाठी लागणारे चलन काढुन देण्याकरीता रुपये 2 लाख लागतील असे सांगितले होते. त्यामुळे मी म्हाडाच्या वरिष्ठ कार्यालयातील मुख्याधिकारी साहेब यांची वारंवार व वेळेवेळी भेट घेऊनही त्यांचा काहीच फायदा झाला नाही. त्यांनी देखील 2 लाख रुपयाची मागणी केली. त्यामुळे दि.20/05/2024 रोजी म्हाडा, पुणे कार्यालयातील श्री अशोक पाटील, मुख्याधिकारी, म्हाडा पुणे यांची भेट घेतली असता त्यांनी अभिजीत जिचकार यांना केबिन मध्ये बोलावून घेऊन ते तुम्हाला चलन देतील त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागा व माझ्याकडे येवू नका असे म्हणून मला जाण्यास सांगितले. त्यानंतर मी अभिजीत जिचकार यांची कार्यालयातच स्वत्रंतरित्या भेट घेतली असता, त्यांनी मला वरील नमुद मंजुर सदनिका पुन्हा वितरीत करुन त्यांचे चलन काढुन देण्याकरीता पैशाची मागणी केली.

यावरुन सदरची रक्कम लाच असल्याची माझी खात्री झाली असून ती देण्याची माझी इच्छा नाही. माझे व म्हाडातील अधिकारी व कर्मचारी यांच्यात कोणतेही अर्थिक हितसंबंध नसुन भांडणतंटा अथवा वैर नाही. तरी माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणी प्रकरणात आपल्या विभागातर्फे कारवाई होण्यास विनंती आहे. वगैरे हकीकताची तक्रार दि. 20/05/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडे दिली होती.

त्यावरुन मी दि.21/05/2024, दि.24/05/2024 व दि.27/05/2024 रोजी पंचासमक्ष पडताळणी कारवाई केली होती. दि.27/05/2024 रोजी यापुर्वी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) पुणे यांना केलेल्या अर्जाची प्रत व्हॉट्सअपव्दारे लोकसेवक श्री. जिचकार यांना पाठविलेली होती. त्याची हार्ड कॉपी देण्यासाठी व म्हाडा पुणे येथे ऑक्शन मध्ये दुकान मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची चौकशी करणेकामी जाणार असल्याने त्यावेळी लोकसेवक श्री.जिचकार हे माझ्याकडे लाच मागणी करतात अगर कसे याची
पडताळणी कारवाई करण्यात आली. त्यावेळी मला लॉटरी मध्ये लागलेल्या सदनिकेची चलन काढुन देण्यासाठी 2 लाख रुपये लाच मागणी केल्याचे मी दिलेल्या तक्रारीतील नमुद लाच मागणीस दुजोरा दिला आहे. तसेच ऑक्शन मध्ये दुकान मिळवुन देण्याची मदत करण्यासाठी स्वत:साठी रु. 50 हजार लाच मागणी केली आहे. तसेच लोकसेवक श्री.जिचकार यांनी त्यांचे वरिष्ठ यांच्याशी चर्चा करुन तडजोडअंती लाच रक्कम किती होईल याबाबत माहिती घेवुन फोन करुन कळवितो असे मला सांगितले होते. त्यानंतर दि.29/05/2024 रोजी लोकसेवक श्री. जिचकार यांनी मला काम करुन देतो असे आश्वासन देवून काम झाले नंतर फोन करतो असे सांगितले होते.

त्यावरुन दि.31/05/2024 रोजी माझ्याकडे 2,70,000/- रुपये येवढी लाच रक्कम म्हणुन देणेकामी उपलब्ध नसल्याने मी माझ्या बचतीमधील रोख रक्कम- 10,000/- रुपये लाच रक्कम म्हणुन हजर केली असता पोनि. माने यांनी सापळा कारवाईसाठी मी दिलेल्या नोटांचे क्रमांक शासकीय पंचासमक्ष लिहुन घेवुन त्यासोबत भारतीय बच्चों का बँक असे लिहीलेले लहान मुलांचे खेळण्यातील 500 दराच्या बनावट नोटा त्यास अँथ्रसिन पावडर लावुन, सापळा कारवाईचे प्रात्यक्षीक समजावुन सांगुन तसेच सुचना देवून रक्कम माझेकडील हिरव्या रंगाचे कापडी पिशवीत ठेवण्यात आली. मला रेकॉर्डर देवून पंचासह 16.33 वा. लोकसेवक श्री. अभिजीत जिचकार यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात आले.

मी म्हाडा, पुणे कार्यालयातील श्री. अभिजीत जिचकार यांनी मागणी केल्याप्रमाणे परमार चेंबर येथील स्टेटस फॅमिली रेस्टॉरंट अँड बार येथे बोलविलेवरुन लाच रक्कम देण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी मला माझे काम झाले बाबत सांगुन माझ्या मोबाईलमधुन माझी माहिती घेवून माझा म्हाडातर्फे लॉटरी पध्दतीने मिळालेले सदनिका पुन्हा वितरीत करुन त्यांचे आर.टी.जी.एस. चलन काढल्याचे सांगुन सर्व काम झाल्याचे सांगितले. त्यावेळी मी लोकसेवक जिचकार यांना सीओ साहेबांचे रु.2,20,000/- व तुमचे रु.50,000/- असे आणल्याचे सांगितले असता बर ठिक आहे असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना माझे काम केल्याबावत रु.50,000/- चे बंडल काढुन दिले असता त्यांनी ते उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पँटचे उजव्या खिशात असलेली पांढरी नायलॉन बँग काढुन त्यात ठेवली. त्यावेळी मी त्यांना तुमचे तुमच्याकडे व साहेबाचे साहेबाकडे देतो असे म्हणालो असता त्यावेळी देखील जिचकार यांनी नकार दिला. तसेच सीओ साहेबांना भेटु ही नका व त्यांना फोन देखील करु नका असे मला सांगण्यात आले. त्यांनतर त्यांनी सीओ साहेबाकरीता आणलेल्या पैशाची मागणी केली असता त्यावेळी मी त्यांना प्रत्येक बंडल मध्ये किती रक्कम आहे हे सांगुन मोजुन घेण्यास सांगितले असता त्याची गरज नसल्याचे सांगुन लोकसेवक श्री. जिचकार यांनी लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन रक्कम पिशवीत ठेवली आहे. त्यानंतर मी नियोजीत इशारा केल्याने सापळा पथकाने लोकसेवक यांना ताब्यात घेतले आहे. याबाबतचे सविस्तर पंचनामे व स्क्रिप्ट पंचासमक्ष करण्यात आलेले आहेत.

तरी मी दिलेल्या तक्रारीवरुन व करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई वरुन लोकसेवक श्री. अभिजीत व्यंकटराव जिचकार वय 34 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद - प्रोजेक्ट मॅनेजर, नेमणुक - म्हाडा कार्यालय, पुणे यांनी सदनिका पुन्हा वितरीत करुन आर.टी.जी.एस. चलन काढुन देण्याकरीता मुख्याधिकारी म्हाडा, पुणे यांचेकरीता रु.2,20,000/- व ऑक्शनमधील दुकानाचे चलन काढुन देण्याकरीता स्वत:साठी रु. 50,000/-ची लाच मागणी करुन रु.2,70,000/- ही लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली असता बरोबर व खरी लिहीली आहे.
तपासी अधिकारी -श्री. विरनाथ माने, पोलीस निरीक्षक, लाप्रवि पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDIPAN VASANTRAO PAWAR(I (Inspector)) / PBMAH75088 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Thadani

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** पोलीस स्टेशन, पुणे शहर.
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANDIPAN VASANTI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH75088

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)